## धनेगाव परिसरातील लुटीची घटना, साडेचार लाख केले होते लंपास

दै. लोकमत दि. 19/05/2022

# व्यापाऱ्याला लुटून मौजमजा करताना अडकले जाळ्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत धनेगाव परिसरात स्कुटीवरून जात असलेल्या दोघांच्या डोळ्यात मिरची पूड टाकून स्कुटीसह साडे चार लाख रुपयांची रक्कम लंपास करण्यात आली होती. लुटीच्या घटनेनंतर पोलीस आपल्यापर्यंत पोहोचणारच नाहीत, या भ्रमात आरोपी आपल्या घरीच मौजमजा करीत बसले होते. स्थानिक गुन्हे शाखा आणि नांदेड ग्रामीण पोलिसांनी त्यातील तिघांच्या मुसक्या आवळल्या असून, दोघे जण अद्याप फरार आहेत.

वाजेगाव येथील किराणाचे होलसेल व्यापारी सय्यद अतिक सय्यद रशीद हे १५ मे रोजी रात्री दुकान बंद केल्यानंतर साडे चार लाख रुपये घेऊन भावासोबत दुचाकीवरून सिडकोकडे येत होते. धनेगाव शिवारात कापूस संशोधन केंद्राजवळ आरोपींनी त्यांना अडविले

### पोलिसांनी पकडलेले आरोपी



■पकडलेले आरोपी हे सराईत असून ज्या आरोपीचा मोबाईल घटनास्थळी सापडला त्याचे सीमकार्ड बाहेर राज्यातील होते. त्यातील मोबाईल क्रमांकावरून ओळख पटविणे सोपे झाले.

दोघांच्याही डोळ्यात मिरची पूड टाकली. त्यानंतर तलवारीचा धाक दाखवून स्कुटीसह साडे चार लाख रुपये लंपास केले. या प्रकरणात नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि.द्वारकादास

यांच्या पथकाला आरोपी शोधण्याची जबाबदारी दिली होती. भारती यांनी खबऱ्याकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे वाजेगाव येथून सोहेब खान शब्बीर खान याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून मिळालेल्या माहितीवरून नूरखान हुसेनखान पठाण रा.रहिमपूर आणि सय्यद ताहेर सय्यद अब्दूल या

### मोबाइल सोडणे पडले महागात

■व्यापारी सय्यद अतिक यांना लुटत असताना एका आरोपीचा मोबाइल घटनास्थळीच पडला होता. ग्रामीण पोलिसांनी हा मोबाइल जप्त केला होता. त्या मोबाइलमधील क्रमांकावरुन पोलिसांना हा गुन्हा कोणी केला असावा, याचा अंदाज आला. त्यानंतर खबऱ्याकडून टिप मिळताच आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आल्या.

■स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वाजेगाव येथे आरोपींच्या घराजवळ गेल्यानंतर आरोपी मात्र बिनधास्त होते. पोलिसांसमोरही ते सहजपणे वावरत होते. आपण कोणताही गुन्हा केला नाही या अविर्भावात असतानाच पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या.

मात्र पसार झाले होते. पुढील तपासासाठी आरोपींना ग्रामीण पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या कारवाईत सपोउपनि गोविंद मुंडे, जसवंतसिंह शाहू, मारोती तेलंग, दशरथ जांभळीकर, बालाजी तेलंग, विठ्ठल शेळके, तानाजी येळगे, मोतीराम पवार, विलास कदम, शेख कलीम यांचा सहभाग होता.